तांदुळनगरी

तांदुळनगरी

निर्भीड निष्पक्ष रोखठोक

दिनांक: 16 ऑगस्ट 2026 रविवार

ब्रेकिंग बातमी

देशाच्या स्वातंत्र्यापासून डिजिटल स्वातंत्र्यार्यंत; सायबर जागरूकतेने घडतोय सुरक्षित भारत

तांदूळनगरी | नागपूर : क्विक हिल फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, नागपूर यांच्या सहकार्याने स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सायबर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या उपक्रमांतर्गत संस्थेतील विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत विविध शाळांमध्ये जाऊन विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. G5 पथकातील कुणाल मेश्राम व ऋतुजा गिरी. तसेच G6 पथकातील अर्शा कावरे व देवाशीष पांडे यांनी विविध शैक्षणिक संस्थांमध्ये सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, डिजिटल सुरक्षितता आणि इंटरनेटचा सुरक्षित वापर याबाबत माहिती दिली.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेचा उद्देश विद्यार्थी तसेच समाजातील प्रत्येक घटकाला डिजिटल युगातील सायबर धोक्यांपासून सावध करणे हा होता. यावेळी फसव्या संदेशांद्वारे माहिती चोरी, ऑनलाईन फसवणूक, बनावट संकेतस्थळे व दुवे, समाजमाध्यमांची सुरक्षितता आणि डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची खबरदारी यांसारख्या महत्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या विशेष उपक्रमाचे नियोजन G5 व G6 पथकातील विद्यार्थ्यांनी केले. त्यांना संस्थेचे शिक्षक समन्वयक डॉ. आशीष बडिदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सायबर जागरूकतेचा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविला.

सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शनाचे प्रमुख मुद्दे

- फसव्या संदेशांद्वारे माहिती चोरी
- ऑनलाईन फसवणूक
- बनावट संकेतस्थळे व दुवे
- समाजमाध्यमांची सुरक्षितता
- डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची खबरदारी

क्विक हिल फाउंडेशन आणि शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, नागपूर यांच्या संयुक्त प्रयत्नांतून राबविण्यात येणारा हा उपक्रम सुरक्षित डिजिटल भारताच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल ठरत आहे. या माध्यमातून विद्यार्थी आणि समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होत आहे.

सायबर सुरक्षा ही काळाची गरज असून, सुरक्षित डिजिटल भविष्यासाठी प्रत्येकाने सजग, सावध आणि जबाबदार नागरिक म्हणून वावरणे आवश्यक आहे.

अशाच ब्रेकिंग बातम्या व ताज्या घडामोडी जाणून घेण्यासाठी आपल्या व्हॉट्सॲपमध्ये 7218031819 ॲड करा.